**ठळक बातम्या**

- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर बारामतीमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

- चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा आर्थिक सर्वेक्षण अहवालाचा अंदाज

- मुंबईतल्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्याच्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालय उच्चाधिकार समिती स्थापन करणार

**आणि**

- सोनं एकाच दिवसात १० हजारांनी तर चांदी २१ हजारांनी महाग, सोन्याचे दर पावणे २ लाखांच्या पलीकडे तर चांदी पावणे ४ लाखांच्या वर

**<><><><><><>**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर आज बारामती इथ विद्या प्रतिष्ठानच्या परिसरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी बंदुकीच्या ३ फैरी झाडून त्यांना सलामी देण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी पुष्पचक्र अर्पण करून अजित पवार यांना आदरांजली वाहिली. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(अंत्यसंस्कारापूर्वी दिवंगत अजित पवार यांच्या पार्थिवाचं अंत्यदर्शन घेण्यासाठी विद्या प्रतिष्ठान परिसरात पहाटेपासूनच जनसागर उसळला होता. सामान्य नागरिक, शेतकरी, युवक, महिला तसें विविध संघटनांचे प्रतिनिधी यांनी उभे राहून आदरांजली अर्पण केली. विधानसभेचे अध्यक्ष ॲड.*

*राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, प्रताप जाधव, रक्षा खडसे, मुरलीधर मोहोळ विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, माजी मुख्यमंत्री सुशिलकुमार शिंदे आणि अशोक चव्हाण, तसंच राज्य मंत्रिमंडळातले अनेक सदस्य, भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, मनसे अध्यक्ष राज ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यावेळी उपस्थित होते. प्रशासनाच्या वतीनं राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आदरांजली अर्पण केली. यावेळी राज्यभरातले खासदार, आमदार, विविध  क्षेत्रातल्या मान्यवरांसह सर्वसामान्य नागरिकांनीही मोठ्या संख्येनं उपस्थित राहून आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप दिला.*

*मुंबईत मंत्रालयात अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वतीनं आयोजित शोक सभेत अजीत पवार यांना आदरांजली वाहण्यात आली. तर, पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरात आज बंद पाळण्यात आला. अनेक दुकानं, व्यापारी आस्थापना आज बंद ठेवण्यात आली.)*

**<><><><><><>**

अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना राज्याचं उपमुख्यमंत्रीपद देण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नरहरी झिरवळ यांनी केली आहे. बारामतीमध्ये ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><><>**

चालू आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील असा अंदाज आज संसदेत सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी हा अहवाल सादर केला. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(ग्राहकांकडून होत असलेली खरेदी आणि गुंतवणूक या आधारे यंदा देशाचा आर्थिक विकास दर ७ पूर्णांक ४ दशांश टक्के राहील आणि सलग चौथ्या वर्षी भारत ही जगातली सर्वाधिक वेगानं वाढणारी अर्थव्यवस्था राहील, असा अंदाज या आर्थिक पाहणी अहवालात व्यक्त केला आहे. दरडोई वार्षिक उत्पन्न २ लाख ५ हजार रुपयांवरुन, २ लाख २० हजार रुपयांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. आगामी आर्थिक वर्षात देशाचा आर्थिक विकास दर ६ पूर्णांक ८ ते ७ पूर्णांक २ टक्क्यांच्या दरम्यान राहील, असा अंदाज आहे. जीएसटीमधे केलेल्या सुधारणा, जागतिक पातळीवरच्या संकटांचं संधीमध्ये केलेलं रुपांतर, या सगळ्या गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी अर्थव्यवस्थेला पुढचं वर्ष लागेल, असं यात नमूद केलं आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरची परिस्थिती अस्थिर असली तरी निराश व्हायचं कारण नाही. निर्यातीवर येत असलेले निर्बंध आणि प्रगत राष्ट्रांकडून तंत्रज्ञानाची होणारी अडवणूक यावर मात करण्यासाठी स्वदेशीवरचं अवलंबित्व वाढवण्याची गरज आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त केली आहे. त्यासाठी कच्च्या*

*मालाचे दर कमी करण्याचं धोरण यात सुचवलं आहे. पायाभूत सुविधा, परवडणाऱ्या दरात कच्चा माल उद्योगांना उपलब्ध झाला, मनुष्यबळ चांगल्या दरात उपलब्ध झालं तर देशांतर्गत निर्मित वस्तूंची किंमत कमी व्हायला यामुळं मदत होईल, असं यात म्हटलंय.*

*डॉलरच्या तुलनेत रुपयाचं सध्याचं मूल्य हे देशाच्या आर्थिक परिस्थितीचं नेमकं चित्र उभं करत नाही. २०२५ या वर्षात वस्तूंच्या आयातीत व्यापार तूट होती तर आयातीच्या तुलनेत आपण अधिक सेवांची निर्यात केली. पण रुपयाला सावरण्यासाठी हे पुरेसं ठरलं नसल्याचं आर्थिक पाहणी अहवालात नमूद केलं आहे. गुंतवणुकीसाठी सुरक्षित ठिकाण असल्यानं सोनं आणि चांदीतली तेजी येत्या काळातही कायम राहील असंही यात म्हटलं आहे. देशातल्या सर्वाधिक गरीब असलेल्या तळाच्या ५-१० टक्के नागरिकांपर्यंत गेल्या काही काळात सरकारी योजनांचे लाभ मोठ्या प्रमाणात पोहोचू लागले आहे. त्यामुळं त्यांच्याकडून विविध वस्तूंची होणारी खरेदी मोठ्या प्रमाणात वाढल्याचं आर्थिक पाहणी अहवालात नमूद आहे. स्थानिक पातळीवर सोयी सुविधा आणखी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन दिल्या तर त्यांच्या परिस्थितीत आणखी झपाट्यानं सुधारणा होईल, अशी शिफारस यात केली आहे. सध्या देशातले सुमारे ५२ टक्के विद्यार्थीच आठवीनंतरचे शिक्षण घेतात. त्यात सुधारणा करण्याची तसंच केवळ विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यावर समाधान न मानता ते किती शिकले यावर लक्ष देण्याची गरज आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त करण्यात आली आहे.)*

**<><><><><>**

मुंबई महानगर प्रदेशातल्या वायू प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात येणार असल्याचं मुंबई उच्च न्यायालयाने आज सांगितलं. प्रदूषण आटोक्यात आणण्यासाठी महानगरपालिका आणि राज्य सरकारने केलेले प्रयत्न अपुरे आहेत, असंही न्यायालयाने सांगितलं. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखालच्या खंडपीठासमोर आज या प्रकरणी सुनावणी झाली, त्यावेळी खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवलं. न्यायालय कुणावरही टीका करत नाहीये पण शुद्ध हवा हा प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे, असं खंडपीठाने स्पष्ट केलं.

**<><><><><>**

शैक्षणिक संस्थांमधे जातीआधारित भेदभाव रोखण्यासाठी नुकत्याच तयार केलेल्या UGC, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोग नियमांना सर्वोच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. या नियमांविरुद्ध दाखल झालेल्या ३ याचिकांवर सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाला बागची यांच्या पीठापुढं सुनावणी झाली. या नियमांची चौकट सकृतदर्शनी मोघम असून याचे गंभीर

परिणाम होऊन शेवटी समाज विभाजित होऊ शकतो, असं मत न्यायालयानं व्यक्त केलं. यावरकेंद्र सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोगानं येत्या १९ मार्चपर्यंत स्पष्टिकरण द्याव, असे निर्देशही न्यायालयानं दिले.

यािप्रकरणी तज्ञ समिती नेमून या नियमांचा फेरआढावा घ्यावा, अशी सूचना सरन्यायाधिशांनी केली. या समितीत कायदा आणि न्यायाशास्त्रातले तज्ञ, तसंच सामाजिक वास्तवाची जाण असलेल्या तज्ञांचा समावेश असावा, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

देशात सोन्याचं दर आज तोळ्यामागे पावणे २ लाखांच्या पलीकडे गेले. एकाच दिवसात सोनं आज तोळ्यामागे सुमारे साडे १० हजार रुपयांनी महाग झालं. त्यामुळं मुंबईच्या सराफा बाजारात करांशिवाय १ तोळा २४ कॅरेट सोनं विकत घेण्यासाठी पावणे दोन लाख रुपये मोजावे लागत होते. करांसह एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ८० हजार रुपये आणि २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ७६ हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कम द्यावी लागत होती.

चांदीच्या दरांनीही आज किलोमागे पावणे ४ लाख रुपयांची पातळी ओलांडली. एकाच दिवसात चांदी किलोमागे २१ हजार ७०० रुपयांनी महाग झाली आणि करांसह एक किलो चांदी विकत घ्यायला ३ लाख ९१ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम द्यावी लागत होती.

सकाळच्या सत्रात घसरलेले शेअर बाजार आर्थिक सर्वेक्षण अहवालाच्या सादरीकरणानंतर वधारले. मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर २२२ अंकांची वाढ झाली आणि तो ८२ हजार ५६६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ७६ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८१९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

रत्नागिरी पोलिसांच्या स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेनं सुमारे ७० जिवंत गावठी बॉम्ब बाळगणाऱ्या एका तरुणाला अटक केली. बॉम्ब आणि चारचाकी वाहन असा दोन लाख ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल या तरुणांकडून जप्त करण्यात आला.

<><><><><><>

गेल्या २४ तासात मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात किमान तापमानात किंचित वाढ झाली.

येत्या दोन दिवसात राज्यात हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><><>//